# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

## ड प्रभाग समिती,
## कार्यपत्रिका क्र. ११
## सभावृत्तांत

दिनांक ०६/०२/२०१५ दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी २०१५ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०६/०२/२०१५ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | अध्यक्षा |
| २. मा.श्रीमती सुनिता राजेश वाघेरे | सदस्या |
| ३. मा. श्रीमती उषा संजोग वाघेरे (पाटील) | सदस्या |
| ४. मा.श्रीम. काळे विमल रमेश | सदस्या |
| ५. मा.श्रीमती तापकीर अनिता मच्छिंद्र | सदस्या |
| ६. मा. श्री.कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ७. मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ८. मा. श्रीमती शितल विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्या |
| ९. मा.श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| १०. मा. श्रीमती जवळकर वैशाली राहुल | सदस्या |
| ११.मा. श्री. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |

----------

याशिवाय मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रिय अधिकारी, मा. मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, मा. गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.विनय ओहोळ, मा. रत्नपारखी,उपअभियंता स्थापत्य, मा. व्ही. के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. अजय जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. देसले, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा. पाडवी, कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग इ. अधिकारी उपस्थित होते.

मा. अध्यक्षा : सर्व उपस्थित सन्मा. नगरसदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करणेत येत आहे.

मा. सचिव : सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता मिळावी.

तदनंतर मा. सदस्य यांचे मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

१)प्रभाग क्र. ५४ पिंपळे निलख येथील पिंपरी चिंचवड महापालिकेचे कै. सोपानराव नथोबा इंगवले व कै. भाऊसाहेब नथोबा साठे या शाळेतील सभागृहास कै. लक्ष्मण बळवंत माने गुरुजी) यांचे नाव देणेबाबत

२)प्रभाग क्र. ५५ मधील हॉटेल गोविंद गार्डन गेट शेजारील बस थांबा काढणे व त्याचठिकाणी नवीन बस थांबा बांधुन देणे

३)प्रभाग क्र. ५५ रहाटणी मनपा शाळा ते रहाटणी गावठाण दरम्यानच्या रस्त्यावरील झाडे वाहतुकीस अडथळा ठरत असल्याचे नागरीकांकडून तक्रारी येत असलेने सदर वाहतुकीस अडथळा ठरणारी झाडे काढणे

४) प्रभाग क्र. ५५ पिंपळे सौदागर येथील महादेव मंदिराजवळील वाचनालय नादुरुस्त झालेले असल्याने व तेथे रात्रीच्या वेळी गैरप्रकार होत असल्याबाबत नागरीकांकडून तक्रारी येत असलेने सदर वाचनालय काढून टाकणे

५)प्रभाग क्र. ४४ अशोक थिएटर मधील महापालिकेचे सार्वजनिक वाचनालय गेल्या २५ वर्षापासुन असुन ते सध्या मोडकळीस आलेले आहे. प्रभागातील नागरीकांच्या मागणीनुसार स्पर्धा परीक्षा केंद्र, व महिला भगिनींसाठी जिम, योगा प्रशिक्षण वर्ग सुरु करणेकामी नवीन इमारत चांगल्या व अत्याधुनिक पध्दतीने बांधणेबाबत

६)स.नं. २९ मधील शिवराज नगर रहाटणी येथे गेली ४० वर्षापासुन गोडांबे परिवार कायम स्वरुपी रहिवाशी असल्याने सदर परिसराला गोडांबे वस्ती असे नामकरण करणे

७) स.नं. २९ मधील शिवराज नगर रहाटणी येथे स्वामी समर्थ मठ ते पार्क रॉयल मार्गाचे नामकरण कबड्डीपटू कै.विष्णु हरिभाऊ गोडांबे असे करणे

८)प्रभाग क्र. ४५ मधील वैभवनगर रस्त्यामध्ये येणारा वृक्ष तोडणे तसेच वाघेरे कॉलनी क्र.२ मध्ये जोग महाराज उद्यानातील झाडांची मुळे उद्यानाच्या सीमाभिंतीलगत असलेल्या घरांच्या भिंतीमध्ये गेली असुन त्या घरांच्या भिंतींना तडा गेल्या असलेने सदर उद्यानातील झाडे काढणेबाबत

९)प्रभाग क्र. ४५ मधील पीसीएमसी कॉलनी, तुळजा भवानी मंदिरावळील मनपाचे संडास ब्लॉक, तसेच नव महाराष्ट्र शाळेजवळील कॉर्नरला असलेले शौचालय, १०० फुटी रोड पिंपरीगाव ते काटे पिंपळे रोडला जोडणा-या रोडला एक शौचालय यांची स्थिती अत्यंत खराब असुन त्या संडास ब्लॉकचा व शौचालयाचा वापर नागरीक करत नसलेने सदर संडास ब्लॉक व शौचालय पाडणेबाबत तसेच प्रभाग क्र. ४५ मधील छत्रपती शिवाजी चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर दवाखाना असुन त्याला लागुन महापालिकेचे वाचनालय आहे. सदर वाचनालयामध्ये बसुन लोक दारु पितात व इतर चाळे करीत असलेने सदर वाचनालय तेथून काढण्याबाबत

१०)ड क्षेत्रिय कार्यालयाकडील सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक मा. प्रभाग समितीसमोर अवलोकनार्थ सादर करणेबाबत

मा. अध्यक्षा : ऐनवेळचे विषय दाखल करुन अंदाजपत्रकाचे कामासाठी सदर सभा दिनांक १३/०२/२०१५ रोजी दुपारी ११.०० वाजेपर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

मा. रामदास बोकड : मा. अध्यक्ष यांचे सूचनेस अनुमोदन देतो.

मा. अध्यक्षा – आजची सभा दिनांक १३/२/२०१५ रोजी दुपारी ११.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत आहे.

सही/-
(आरती चोंधे )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४१‍१०१७

क्रमांक – ड/१३/कावि/ १४/२०१५
दिनांक – १२/०२/२०१५

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ११

सभावृत्तांत

दिनांक १३/०२/२०१५ दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी २०१५ ची तहकुब मासिक सभा शुक्रवार दिनांक १३/०२/२०१५ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृह येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | अध्यक्षा |
| २ | मा. श्री. अरुण मदन टाक | सदस्य |
| ३ | मा.श्रीमती सुनिता राजेश वाघेरे | सदस्या |
| ४ | मा. श्रीमती उषा संजोग वाघेरे (पाटील) | सदस्या |
| ५ | मा.श्री.विनोद जयवंत नढे | सदस्य |
| ६ | मा.श्रीमती तापकीर अनिता मच्छिंद्र | सदस्या |
| ७ | मा. श्री.कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ८ | मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ९ | मा. श्रीमती शितल विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्या |
| १० | मा.श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| ११ | मा. श्रीमती जवळकर वैशाली राहुल | सदस्या |
| १२ | मा. श्री. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |

----------

याशिवाय मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रिय अधिकारी, मा. मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, मा. गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, मा.विनय ओहोळ, मा. रत्नपारखी,उपअभियंता स्थापत्य, मा. व्ही. के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. अजय जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. देसले, मा. जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.नितीन देशमुख,उपअभियंता, विद्युत, मा. पाडवी, कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग, मा.गोसावी, उद्यान निरीक्षक, मा. गायकवाड, सोनवणे, आरोग्य निरीक्षक इ. अधिकारी उपस्थित होते.

मा. अध्यक्षा : सर्व उपस्थित सन्मा. नगरसदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करणेत येत आहे.

मा. सचिव : मागील सभा कार्यपत्रिका क्र. १० चा सभावृत्तांत कायम करणे
मा. अध्यक्षा : मागील सभा कार्यपत्रिका क्र. १० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा. सचिव : ड प्रभाग समिती कार्यपत्रिकेवरील विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र. ४० विषय क्र. १

दिनांक १३/०२/२०१५ विभाग –प्रशासन

संदर्भ : ड क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील विषय क्र.डक्षे/१/कावि/११४/२०१५ दि. ०३/०२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

ड क्षेत्रिय कार्यालय प्रशासन विभागाकडील " प्रवास भत्ता" या लेखाशिर्षावर सध्या असलेली तरतूद अपुरी असल्याने प्रशासन विभागाकडील आकस्मिक खर्च परिशिष्ट ब मधील "इतर खर्च" या लेखाशिर्षावरील र.रु. २०,०००/- इतकी तरतुद प्रवास भत्ता या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

-------------

ठराव क्र. ४१ विषय क्र. २

दिनांक १३/०२/२०१५ विभाग –स्थापत्य विभाग

सुचक – मा. आरती चोंधे अनुमोदक– मा. कैलासभाऊ थोपटे

संदर्भ : मा. आरती चोंधे यांचा दिनांक १३/०२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५४ पिंपळे निलख येथील पिंपरी चिंचवड महापालिकेचे "कै. सोपानराव नथोबा इंगवले" व कै. भाऊसाहेब नथोबा साठे" या शाळेतील सभागृहास "कै. लक्ष्मण बळवंत माने (गुरुजी)" यांचे नाव देणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

-----------------

ठराव क्र. ४२ विषय क्र. ३

दिनांक १३/०२/२०१५ विभाग –स्थापत्य विभाग

सुचक – मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक– मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा. शत्रुघ्न उर्फ बापू सिताराम काटे यांचा दिनांक १३/०२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५५ मधील हॉटेल गोविंद गार्डन गेट शेजारील बस थांब्याची अवस्था फार वाईट झाली असुन तो मोडकळीस आलेला आहे. परि सरातील लहान मुले, स्त्रिया व ज्येष्ठ नागरीक आजही सदर बस थांब्याचा वापर करीत असुन सदर बस थांब्याची अवस्था मोडकळीस आली असल्याने सदर बसथांबा काढणे व त्याच ठिकाणी नवीन बस थांबा बांधुन देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

------------

ठराव क्र. ४३ विषय क्र. ४

दिनांक १३/०२/२०१५ विभाग –स्थापत्य विभाग

सुचक – मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे अनुमोदक– मा. विमल रमेश काळे

संदर्भ : मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे यांचा दिनांक १३/०२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५५ रहाटणी मनपा शाळा ते रहाटणी गावठाण दरम्यानच्या रस्त्यावरील झाडे वाहतुकीस अडथळा ठरत होत असल्याच्या नागरीकांकडून तक्रारी येत असल्याने सदर ठिकाणची वाहतुकीस अडथळा ठरत असलेली झाडे काढणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

---------------

ठराव क्र. ४४ विषय क्र. ५

दिनांक १३/०२/२०१५ विभाग –स्थापत्य विभाग

सुचक – मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे अनुमोदक– मा. विमल रमेश काळे

संदर्भ : मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे यांचा दिनांक १३/०२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५५ पिंपळे सौदागर येथील महादेव मंदिराजवळील वाचनालय नादुरुस्त झालेले असल्याने व तेथे रात्रीच्या वेळी गैरप्रकार होत असल्याबाबत नागरीकांकडून तक्रारी येत असलेने सदर वाचनालय काढून टाकणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

------------

ठराव क्र. ४५ विषय क्र. ६

दिनांक १३/०२/२०१५ विभाग –स्थापत्य विभाग

सुचक – मा. सुनिता राजेश वाघेरे अनुमोदक– मा. रामदास गेणभाऊ बोकड

संदर्भ : मा. सुनिता राजेश वाघेरे यांचा दिनांक १३/०२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४४ अशोक थिएटर मधील महापालिकेचे सार्वजनिक वाचनालय गेल्या २५ वर्षापासुन असुन ते सध्या मोडकळीस आलेले आहे. प्रभागातील नागरीकांच्या मागणीनुसार स्पर्धा परीक्षा केंद्र, व महिला भगिनींसाठी जिम, योगा प्रशिक्षण वर्ग सुरु करणेकामी नवीन इमारत चांगल्या व अत्याधुनिक पध्दतीने बांधणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

------------

ठराव क्र.४६ विषय क्र. ७

दिनांक १३/०२/२०१५ विभाग –स्थापत्य विभाग

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक– मा. रामदास गेणभाऊ बोकड

संदर्भ : मा. कैलासभाऊ थोपटे यांचा दिनांक १३/०२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

स.नं. २९ मधील शिवराज नगर रहाटणी येथे गेली ४० वर्षापासुन गोडांबे परिवार कायम स्वरुपी रहिवाशी असल्याने सदर परिसराला" गोडांबे वस्ती" असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

--------------

ठराव क्र.४७ विषय क्र. ८

दिनांक १३/०२/२०१५ विभाग –स्थापत्य विभाग

सुचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक– मा. रामदास गेणभाऊ बोकड

संदर्भ : मा. कैलासभाऊ थोपटे यांचा दिनांक १३/०२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

स.नं. २९ मधील शिवराज नगर रहाटणी येथे स्वामी समर्थ मठ ते पार्क रॉयल मार्गाचे नामकरण कबड्डीपटू " कै.विष्णु हरिभाऊ गोडांबे मार्ग " करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

--------------

ठराव क्र. ४८ विषय क्र. ९

दिनांक १३/०२/२०१५ विभाग –स्थापत्य विभाग

सुचक – मा.उषा संजोग वाघेरे (पाटील) अनुमोदक – मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा.उषा संजोग वाघेरे (पाटील) यांचा दि. १३/०२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४५ मधील वैभवनगर रस्त्यामध्ये एक झाड असुन त्या झाडामुळे दिवसा व रात्री अपघात होतात. त्याच प्रमाणे सदर झाड रस्ता रुंदीकरणासाठी आरक्षित जागेमध्ये आहे. सदर झाड तोडणे तसेच वाघेरे कॉलनी क्र.२ मध्ये जोग महाराज उद्यानातील झाडांची मुळे उद्यानाच्या सीमाभिंतीलगत असलेल्या घरांच्या भिंतीमध्ये गेली असुन त्या घरांच्या भिंतींना तडा गेल्या असलेने सदर उद्यानातील झाडे काढणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

--------------

ठराव क्र.४९ विषय क्र. ९

दिनांक १३/०२/२०१५ विभाग –स्थापत्य विभाग

सुचक – मा.उषा संजोग वाघेरे (पाटील) अनुमोदक – मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा.उषा संजोग वाघेरे (पाटील) यांचा दि. १३/०२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४५ मधील पीसीएमसी कॉलनी, तुळजा भवानी मंदिरावळील मनपाचे संडास ब्लॉक, तसेच नव महाराष्ट्र शाळेजवळील कॉर्नरला असलेले शौचालय, १०० फुटी रोड पिंपरीगाव ते काटे पिंपळे रोडला जोडणा-या रोडला एक शौचालय यांची स्थिती अत्यंत खराब असुन त्या संडास ब्लॉकचा व शौचालयाचा वापर नागरीक करत नसलेने सदर संडास ब्लॉक व शौचालय पाडणेबाबत तसेच प्रभाग क्र. ४५ मधील छत्रपती शिवाजी चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर दवाखाना असुन त्याला लागुन महापालिकेचे वाचनालय आहे. सदर वाचनालयामध्ये अवैध कामे चालत असलेने सदर वाचनालय तेथून काढण्याबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

---------------

ठराव क्र. ५०　　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्र. १०

दिनांक: १३/०२/२०१५　　　　　　　　　　　　　　　विभाग : प्रशासन विभाग

संदर्भ : ड क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील प्रस्ताव क्र. डक्षे/३/कावि/७०/१५ दि. ६/२/२०१५

ड क्षेत्रिय कार्यालयाकडील सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक मा. प्रभाग समितीसमोर अवलोकनार्थ सादर करणेत आले. सदर प्रस्तावास ड प्रभाग समिती सर्व सदस्यांनी खालीलप्रमाणे उपसूचनेसह मान्यता दिली.

“सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रकातील ड प्रभाग कार्यक्षेत्रासाठी ठेवलेल्या तरतुदीतील मार्च २०१५ अखेर असलेली शिल्लक तरतुद कायम ठेवणेत येऊन सन २०१५-१६ साठी सादर केलेल्या मुळ अंदाजपत्रकातील तरतुदीसह सन २०१५-१६ चे मूळ अंदाजपत्रक मान्य करणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------

मा. अध्यक्षा : सभेचे कामकाज संपलेचे जाहीर करते.

सही/-

(आरती चोंधे )

**सभापती**

ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/कावि/२३ /२०१५

दिनांक – १३/ ०२ /२०१५

सही/-

**प्रशासन अधिकारी तथा**

सचिव (सभाशाखा)

ड प्रभाग समिती